● गुरुवार, दि. ३० जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १८२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282





शिवाजी पुतळ्याजवळील जैन मंदिरात बुधवार (दि २९) रोजी गणेश लालजीची ६३ पुण्यतिथी मोठ्या उत्साहात व भक्ती भावाने साजरी करण्यात आली याप्रसंगी मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत आहे. (छायाचित्र किरण खानापुरे)

## प्रयागराज; चेंगराचेंगरीत ३० भाविकांचा मृत्यू; उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले दुःख

**मुंबई -** प्रयागराज या ठिकाणी कुंभमेळा सुरु आहे. फेब्रुवारी महिन्यातही काही पर्वण्या असणार आहेत. दरम्यान मौनी अमावस्येची पर्वणी साधण्यासाठी आणि पवित्र स्नान करण्यासाठी आलेल्या ३० भाविकांचा चेंगराचेंगरीत मृत्यू झाला आहे. या घटनेबाबत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी आज उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी संपर्क साधून मदतीचे आवाहन केले आहे.

# शासकीय कार्यक्रमातून खा. डॉ. कल्याण काळे यांना डावलने आयोजकांना पडणार महागात!

## हक्कभंग कारवाई करणार - खा. डॉ. काळे; स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दबावात नाव घेतले नसल्याचा प्र प्राचार्याचा खुलासा, माफीची याचना!

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील भोकरदन येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोकरदनचे स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन, जि.जालना चा नामांतर सोहळा शनिवार, दिनांक २५.०१.२०२५ रोजी आयोजन करण्यांत आला होता. या कार्यक्रमाची पुर्वकल्पना खा. डॉ. कल्याण काळे यांना देण्यात आली नव्हती. तसेच कार्यक्रम पत्रिकेत व कोनशिलेत प्रोटॉकॉलप्रमाणे नावाचा समावेश करण्यात आला नसल्याने खा. डॉ. काळे यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केले तसेच लोकप्रतिनिधी कायद्याचे उल्लंघन केले म्हणून हक्कभंगाची कारवाई करणार असल्याचे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य व आयोजकांना कळविल्यानंतर अवघ्या चोविस तासाच्या आत आयोजकांनी खुलासा सादर करत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दबावाखाली कार्यक्रम संपन्न झाल्याचे मान्य करत झालेल्या चुकीबद्दल माफ करण्याची विनंती खा. डॉ. काळे यांना केली आहे. आता खा. डॉ. काळे यांच्या चुकीला माफी देतात की हक्कभंगाची कारवाई करतात हे लवकरच स्पष्ट होईल.

खा.डॉ काळे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, लोकप्रतिनिधी कायद्याचे आपण उल्लंघन केलेले आहे. आपली ही वर्तणुक जालना लोकसभा म तदारसंघाचा सदस्य या नात्याने लोकप्रतिनिधींचा सन्मानाची वागणुक देणे हे आपल्या कर्तव्याचा भाग असतांना देखील अशा प्रकारचे बेजबाबदार वर्तन करून माझा व माझ्या लोकसभा सदस्यत्वाचा तसेच मतदारसंघाचा जाणिवपुर्वक अवमान केला आहे. जालना लोकसभा मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणुन संसदीय लोकशाहीमध्ये माझे कर्तव्य, जबाबदारी व अधिकार आहेत. मात्र आपल्या अशा वागण्याने माझ्या कर्तव्यात, हक्कात, अधिकारात तसेच कामात अडथळा निर्माण झाला आहे. साम ान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. विमंस २०१३/प्र.क्र.६७/१८ (र.व का.), दिनांक २७.०७.२०१५ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.विमंस-२०१३/प्र.क्र.६७ /१८ (र.व का.), दिनांक १७.०१.२०१४ अन्वये विधानमंडळ / संसद सदस्याला अशाप्रकारे दुर्लक्षित करणे, सन्मानपुर्वक वागणुक न देणे ही बाब एक प्रकारे लोकसभा सदस्याचा हक्कभंग करणारी आहे. आपल्या विरोधात विशेष हक्कभंग समितीकडे हक्कभंगाची कारवाई करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणार आहे. आपण ४८ तासात तात्काळ व्यक्तीशः खुलासा सादर करावा. आपण खुलासा सादर न केल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून आपणांवर हक्कभंगाची कारवाई करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणार असल्याची नोटीस खा. डॉ.कल्याण काळे यांनी डी.एम.राठोड, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जालना. के.बी.ठाकुर, प्राचार्य तथा सदस्य सचिव, आय.एम.सी., आयटीआय, भोकरदन, जि.जालना, आ.के.जाधव, शि.नि.तथा सदस्य, आय.एम.सी., आयटीआय, भोकरदन, जि.जालना, एस.एस. नाईक, समन्वयक, आय.एम.सी., आयटीआय, भोकरदन, जि.जालना यांना दिली व डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हाधिकारी, जालना जिल्ह्याचे प्रमुख म्हणुन काय कारवाई करणार असे पत्र पाठविले.

यासंदर्भात जिल्हा राठोड यांनी खुलास सादर केला की, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जालना हे जिल्हास्तरीय कार्यालय असुन वरिष्ठ कार्यालयास पत्र/माहितीची त्वरीत देवाण घेवाण करण्यासाठी सदरील कार्यालय आहे. तसेच सदरील कार्यालय कोणत्याही शासकीय कार्यक्रम घेण्या बाबतची परवानगी देण्याचे अधिकार या कार्यालयास नाही त्यामुळे संबंधित कार्यक्रमाशी या कार्यालयाचा कुठलाही एक संबंध नाही. परंतु त्यांनी प्राचार्यांना पत्र पाठवुन या नामांतर सोहळ्यासाठी प्रोटॉकॉल प्रमाणे व लोक प्रतिनिधी कायद्याच्या सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. विमंस २०१३/प्र.क्र.६७/१८ (र.प. का), दिनांक २७.०७.२०१५ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.विमंस-२०१३/प्र.क्र.६७/१८ (र.व.का.), दिनांक १७.०१.२०१४ अन्वये विधानमंडळ/संसद सदस्यांना प्रोटॉकॉल प्रमाणे मा. जिल्हाधिकारी महोदय व मा. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांच्या मान्यते नुसार परवानगी घेऊन तयार पान २ वर

युवा आदर्श

### गांधीजी ...

नोटे वरले गांधीजी
प्रिय वाटती सकला
खिशात भरता नोटा
माणूस जाई विकला
सत्यमेव जयते बोले
कितीकरालं नकला
स्पष्ट दिसे हिंसकता
आरशां पहा शकला
गांधी विचार अवघड
अवजड का शृंखला
काल बाह्य समजतो
आचार ते विसृंखला
सेल्फी वुईथ चरखा
आब केवढा राखला
खादी घालून दाखवे
गांधीवादाचा दाखला
जयंती न् पुण्यतिथी
कमरेतून तू वाकला
फक्त समारोहा पुरता
मोद सिमीत टिकला
नाव घेऊन बापूजींचे
निवडणूका जिंकला
उपोषण उठसूठ करे
विरोध मार्ग आखला
राज घाटा नतमस्तक
सत्तेचा स्वाद चाखला
नथुराम कसा टपला
रूतून बसला चिखला

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## नळविहिरा येथील शेतरस्ते व नळदमयंती तीर्थक्षेत्र विकासासाठी निधीची तरतूद करा

### संजय मोरे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या माध्यमातून लोकसहभागातून दिड वर्षांपूर्वी झालेल्या जाफराबाद तालुक्यातील नळविहिरा येथील अत्यावश्यक अशा रस्त्यांना मातोश्री ग्रामसमृद्धी शेत /पाणंद रस्ते योजनेंतर्गत तात्काळ मान्यता देऊन निधीची तरतूद करण्याची मागणी ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे.



बुधवार ( दि.२९ ) रोजी श्री. संजय मोरे पाटील यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नळविहिरा डांबर रोड ते दमयंती नगरी - मार्गे प्रास्तावित जिल्हा रस्ता क्रमांक ५६ गोंधनखेडा - सावंगी फाटा. (अंदाजे अंतर एक किमी ), नळविहिरा - खामखेडा शिव रस्ता (अंदाजे अंतर अर्धा किमी ), आनंदनगर - मोरंडी - डाबर शेत रस्ता (अंदाजे अंतर एक किमी ), अंगणवाडी क्रमांक एक ते हिवरा काबली शिव पर्यंत शेत रस्ता (अंदाजे अंतर एक किमी ), खामखेडा शिव - मांगटेकी - आनंदनगर शेत रस्ता (अंदाजे अंतर एक किमी ), सावरगाव रस्ता ( उंबऱ्या मळा ) ते हिवरा शिव शेत रस्ता (अंदाजे अंतर एक किमी ), खामखेडा शिव ते दमयंती नदी मार्गे श्री. गजानन/ विजय ग्यानुबा गाडेकर यांचा बंधुरा शेत रस्ता (अंदाजे अंतर अर्धा किमी ),नळविहिरा जि. प. शाळा ते बोरखेडी चिंच शिव पर्यंत शेतरस्ता (अंदाजे अंतर दोन किमी), नळविहिरा ते सावरगाव म्हस्के फाटा (अंदाजे अंतर दोन किमी), लघु पाटबंधारा क्र. दोन ते सावरगाव म्हस्के फाटा (अंदाजे अंतर दोन किमी) या रस्त्यांसह 'क' वर्ग तीर्थस्थानात समावेश असलेल्या जगातील एकमेव पुरातन व जागृत तीर्थस्थान म्हणून अशी ओळख असलेल्या नळविहिरा येथील ' जय तिर्थेश्वर गणेश मंदिर श्री. नळदमयंती संस्थानचा वर्गबदल करून तीर्थस्थानाच्या दोन्ही बाजूला असलेल्या नद्यालगत संरक्षण भिंत व पुल बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्याची मागणीही आपल्या निवेदनाद्वारे श्री. संजय मोरे पाटील यांनी केली आहे.

## विद्यार्थ्यांच्या आवाजाने गजबजला शाळेचा बालबाजार; २५ हजार रुपयांची झाली उलाढाल

**घनसावंगी । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पानेवाडी तालुका घनसावंगी येथे मंगळवार दिनांक. २८.०१.२०२५ रोजी बालबाजार (आनंदनगरीचे) आयोजन करण्यात आले होते. मुलांचे व्यावहारिक ज्ञान वाढवण्यासाठी तसेच शिक्षणाबरोबरच आर्थिक व्यवहाराचे ज्ञान प्रत्यक्ष कृतीतून मिळावे त्यासाठी विद्यार्थ्यांनी उत्साहात शेतीमधील भाजीपाला व स्वतः बनवलेले



पदार्थ,वस्तू यांचे स्टॉल लावून त्यांची विक्री केली.सदर बालबाजारात इयत्ता- पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन विविध प्रकारच्या २० ते २५ प्रकारच्या साहित्यांचे/ पदार्थांचे स्टॉल मांडून जवळपास २५ हजार रुपयांची उलाढाल केली. याम धून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष खरेदी-विक्रीचा अनुभव घेता आला बालबाजारात सर्व प्रकारचा भाजीपाला, विविध फळे, सम ोसे, कचोरी,चहा, पाणीपुरी, धपाटे, पान २ वर

### लाउडस्पीकर वादावर मोईनुद्दीन अशरफींचे मोठे विधान

## कायद्याचे कठोर पालन आवश्यक!

### वक्फ सुधारणा विधेयक मुसलमानांवर जबरदस्ती लादल्याचा आरोप

**जालना । प्रतिनिधी -** धार्मिक स्थळांवर लाउडस्पीकर वापराबाबत बॉम्बे उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे मुस्लिम समाजाने कठोरपणे पालन करावे, असे मत ऑल इंडिया सुन्नी जमीयत-उल-उलेमा संघटनेचे अध्यक्ष आणि मुंबईतील प्रसिद्ध धार्मिक गुरू सय्यद मोईनुद्दीन अशरफी यांनी व्यक्त केले. त्यांनी स्पष्ट केले की हा आदेश केवळ मशिदींनाच लागू नाही, तर सर्व धर्मांच्या उपासना स्थळांना लागू आहे. त्यांनी सांगितले की इस्लाममध्येही इतरांना त्रास होऊ नये, पान २ वर



# संपादकीय

## देश बलशाली होईल!

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे आपले दोन राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही सण संपूर्ण भारतात मोठया उत्साहात साजरे केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्यांला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात ; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही. भारताला ब्रिटिश राजवटीपासून १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते भारताचे कायदे हे भारतीय राज्य शासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर ( कलमावर ) आधारित होते. स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम आणि कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क आणि कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते. हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे असे आव्हान करण्यात आले. तेंव्हा ते संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती स्थापन करण्यात समिती नेमण्यात आली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील या समितीने दोन वर्ष अकरा महिने अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विमर्श आणि सुधारणा केल्यानंतर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले. संविधानेने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## सिद्धार्थ महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

**जाफराबाद | प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाङ्मय मंडळ व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये महाविद्यालयातील ग्रंथालयातर्फे ग्रंथ प्रदर्शन, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, ज्येष्ठ लोक कलावंत श्री तुळशीराम यदमाळ यांची मुलाखत तसेच रांगोळी स्पर्धा, पुस्तक परीक्षण, घोषवाक्य व निबंध लेखन स्पर्धा, चारोळी स्पर्धा विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी वाचन स्पर्धा इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.

भक्तिचा सुगंध सर्वत्र पसरवत ५८व्या निरंकारी संत समागमाची यशस्वीरित्या सांगता; महाराष्ट्रासह देश-विदेशातील भाविक उपस्थित

# जीवनाचा उद्देश केवळ भौतिक प्रगती नसून आत्मिक उन्नतीमध्ये निहित आहे - सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज

**जालना | प्रतिनिधी -** जीवनाचा उद्देश केवळ भौतिक प्रगतीमध्ये नसून आत्मिक उन्नतीमध्ये निहित आहे. असे उद्गार निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या ५८व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या समापन दिवशी लाखोंच्या संख्येने उपस्थित मानव परिवाराला संबोधित करताना व्यक्त केले. या तीन दिवसीय संत समागमाची रविवारी रात्री विधिवतपणे यशस्वीरित्या सांगता झाली. या संत समागमामध्ये महाराष्ट्रासह देश-विदेशातून लाखो लोकांनी भाग घेतला. सतगुरु माताजी पुढे म्हणाल्या, मानवी जीवन एवढ्याचसाठी श्रेष्ठ मानले गेले आहे, की या जीवनात आत्मज्ञान प्राप्त करण्याची क्षमता आहे. परमात्मा निरकार असून या परमसत्याला जाणणे हेच मनुष्य जन्माचे परम लक्ष्य होय.

शेवटी, सतगुरु माताजींनी सांगितले, की जीवन एक वरदान असून ते परमात्म्याशी क्षणोक्षणी संलग्न राहून जगायला हवे. क्षणोक्षणी जीवन योग्य दिशेने व्यतीत केल्याने आपल्याला आत्मिक शांती मिळू शकते आणि आम्ही अनंताच्या दिशेने अग्रेसर होऊ शकतो. तत्पूर्वी समागमाच्या दुसाया दिवशी सतगुरु माताजींनी आपल्या प्रवचनामध्ये सांगितले, की जीवनामध्ये ज्ञान आणि कर्म या दोहोंचा संगम गरजेचा आहे ज्यायोगे जीवन सुखमय बनू शकेल. जसे पक्ष्याला आकाशात झेप घेण्यासाठी दोन्ही पंखांची गरज असते तसेच जीवनात उंच भरारी घेण्यासाठी ज्ञान प्राप्त करुन त्यानुसार कर्म करण्याची गरज असते. ब्रह्मज्ञानी भक्त जीवनात परमात्म्याशी नाते जोडून प्रत्येक कार्य त्याच्या अनुसंधानामध्ये राहून करत असतो. खरं तर हेच भक्तीचे वास्तविक स्वरूप होय. समागमात आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांनी आपल्या विचारांमध्ये सांगितले, की भक्ती करण्याचा हेतु हा परमात्म्याशी प्रेम जोडण्याचा असावा. या संदर्भात संतांचे जीवन आम्हाला प्रेरणादायी ठरते. कारण संत आपल्या आत्म्याचे मूळ स्वरूप जाणून जीवनाला योग्य दिशेला घेऊन जाण्याची शिकवण देतात. आपण आपली आस्था आणि श्रद्धेला सत्याकडे वळविले पाहिजे तेव्हाच परमात्म्याच्या प्रति प्रेम उत्पन्न होईल आणि खाया अर्थाने भक्तीचा विस्तार सार्थक ठरेल. संत समागमाच्या शुभारंभ प्रसंगी सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांनी मानवतेच्या नावे दिलेल्या आपल्या पावन संदेशामध्ये सांगितले, की मनुष्य रुपात जन्म प्राप्त केल्यानंतर दिव्य मानवीय गुणांनी युक्त होऊन आध्यात्मिकता व भौतिकता यांचे संतुलन साधत श्रेष्ठ जीवन जगावे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारे सांसारिक उपलब्धिंच्या बाबतीत मानवाने खूपच प्रगती केली आहे ही कौतुकास्पद बाब आहे. तथापि, या उपलब्धींचा मानवाला खाया अर्थाने तेव्हाच सदुपयोग होतो जेव्हा परमात्म्याची ओळख करुन आध्यात्मिकता जीवनात प्रवेश करते. समागमाच्या पहिल्या दिवशी सकाळी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या दिव्य आगमनाचे औचित्य साधुन श्रद्धालु भक्तांनी एका भव्य शोभायात्रेचे आयोजन केले ज्यामध्ये एका बाजुला भक्तांनी आपल्या हृदयसम्राट सतगुरुचे भावपूर्ण स्वागत केले तर दुसाया बाजुला मिशनच्या शिकवणूकीवर आधारित महाराष्ट्र तसेच भारताच्या वेगवेगळा संस्कृतींचे अद्भूत मिलन दर्शविणाया चित्ररथ स्वरूप प्रस्तुतींचे सुंदर सादरीकरण केले जे प्रेक्षकांच्या आकर्षणाचे कारण ठरली. निरंकारी समागमाच्या दुसाया दिवशी सकाळी एक भव्य सेवादल रॅली आयोजित करण्यात आली ज्यामध्ये हजारोंच्या संख्येने महिला व पुरुष स्वयंसेवकांनी आपापल्या खाकी व निळा वर्दीमध्ये सुसज्जित होऊन भाग घेतला. या रॅलीमध्ये मिशनच्या शिकवणूकीवर आधारित लघुनाटिकांचे सादरीकरण सेवादल सदस्यांकडून करण्यात आले ज्यांच्या माध्यमातून भक्तीमध्ये सेवेचे महत्व अधोरेखित करण्यात आले. महाराष्ट्राच्या विविध भागातील, जसे कोकण, मराठवाड़ा, खान्देश, विदर्भ, मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्र येथील सेवादल यूनिट्सनी या रॅलीमध्ये प्रेरणादायक प्रस्तुती



सादर केल्या.

रॅलीमध्ये सेवादल बंधु-भगिनींना आपले आशीर्वाद प्रदान करताना सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज म्हणाल्या, की सेवादलाच्या सदस्यांनी अहंकाररहित होऊन मर्यादा व अनुशासनाचे पालन करत सेवा करत जायचे आहे. प्रत्येक सेवादल सदस्याने निरंकार परमात्माच्या सेवेला प्राथमिकता देत याच मार्गावर आपले जीवन व्यतीत करावे. समागमाच्या दुसाया दिवशी सायंकाळी सत्संग समारोहामध्ये उपस्थित विशाल जन समुदायाला आपल्या अमृतवाणीने कृतार्थ करताना सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांनी सांगितले, की जीवनामध्ये ज्ञान आणि कर्म या दोहोंचा संगम गरजेचा आहे ज्यायोगे जीवन सुखमय बनू शकेल. जसे पक्ष्याला आकाशात झेप घेण्यासाठी दोन्ही पंखांची गरज असते तसेच जीवनात उंच भरारी घेण्यासाठी ज्ञान प्राप्त करुन त्यानुसार कर्म करण्याची गरज असते. ब्रह्मज्ञानी भक्त जीवनात परमात्म्याशी नाते जोडून प्रत्येक कार्य त्याच्या अनुसंधानामध्ये राहून करत असतो. खरं तर हेच भक्तीचे वास्तविक स्वरूप होय. समागमात आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांनी आपल्या विचारांमध्ये सांगितले, की भक्ती करण्याचा हेतु हा परमात्म्याशी प्रेम जोडण्याचा असावा. या संदर्भात संतांचे जीवन आम्हाला प्रेरणादायी ठरते. कारण संत आपल्या आत्म्याचे मूळ स्वरूप जाणून जीवनाला योग्य दिशेला घेऊन जाण्याची शिकवण देतात. आपण आपली आस्था आणि श्रद्धेला सत्याकडे वळविले पाहिजे तेव्हाच परमात्म्याच्या प्रति प्रेम उत्पन्न होईल आणि खाया अर्थाने भक्तीचा विस्तार सार्थक ठरेल. समागमाच्या तिसाया दिवशी एका बहुभाषी कवि दरबारचे आयोजन करण्यात आले ज्याचे शीर्षक होते 'विस्तार - असीम की ओर' महाराष्टा व्यतिरिक्त देशाच्या विविध भागातून आलेल्या एकंदर २१ कवींनी मराठी, हिन्दी, इंग्रजी, कोंकणी, भोजपुरी आदि भाषांच्या माध्यमातून काव्य पाठ करत मिशनचा दिव्य संदेश प्रसारित केला. श्रोत्यांनी या कवि दरबाराचा भरपूर आनंद लुटण्याबरोबरच कवि सज्जनांचे कौतुक केले. मुख्य कवि दरबारा व्यतिरिक्त समागमाच्या प्रथम दिनी बाल कवि दरबार तर दुसाया दिवशी महिला कवि दरबाराचे आयोजन केले गेले. या दोन्ही लघु कवि दरबारांमध्ये मराठी, हिन्दी व इंग्रेजी भाषांच्या माध्यमातून महिला व पुरुष बाल कवींनी काव्य पाठ केला ज्याची श्रोत्यांनी खूप प्रशंसा केली. या समागमात 'विस्तार-असीम की ओर' या मुख्य विषयावर आधारित निरंकारी प्रदर्शनी श्रोत्यांसाठी विशेष आर्कषणाचे केंद्र बनून राहिली. या प्रदर्शनीचे मुख्यतः दोन भागांमध्ये विभाजन करण्यात आले होते. प्रथम भागात मिशनचा इतिहास, विचारधारा आणि सामायिक उपक्रमांच्या व्यतिरिक्त सतगुरुंनी देश व विदेशांमध्ये केलेल्या मानव कल्याण यात्रांची सचित्र माहिती देण्यात आली होती तर दुसाया भागात संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन मार्फत राबविल्या जाणाया सामाजिक कार्याची माहिती दर्शविण्यात आली होती. त्यामध्ये प्रामुख्याने संपूर्ण भारतात राबविला जात असलेला प्रोजेक्ट वननेस वन तसेच प्रोजेक्ट अमृत हे उल्लेखनीय होते. या शिवाय निरंकारी इंस्टिट्यूट ऑफ म्युझिक ॲन्ड आर्ट्स प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्याचे दिसले. समागमामध्ये काईरोप्रॅक्टिक थेरपी द्वारे निःशुल्क उपचार करण्याचे शिबिर आयोजन करण्यात आले होते. ही थेरपी मुख्यत्वे पाठीच्या कण्याच्या विकारांशी निगडित आहे. या तंत्राने उपचार करणारी ऑस्ट्रेलिया, यूनायटेड किंगडम, फ्रांस, अमेरिका येथील १८ डॉक्टरांची टीम आपल्या निष्काम सेवा प्रदान करत होती. यावर्षी जवळपास ३५०० लोकांनी या थेरपीद्वारे उपचाराचा लाभ घेतला. समागम स्थळावर एक ६० बेडचे हॉस्पिटल तयार करण्यात आले होते ज्यामध्ये आपत्कालीन परिस्थितीत आयसीयूची सुविधाही उपलब्ध होती. या व्यतिरिक्त तीन ठिकाणी निःशुल्क होमियोपॅथी व डिस्पेन्सरींची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये वायसीएमए हॉस्पिटल तसेच डी वाय पाटील हॉस्पिटलने महत्वपूर्ण योगदान दिले. समागम स्थळावर ११ ॲम्ब्युलन्स तैनात होत्या. स्वास्थ्य सेवेमध्ये २८२ डॉक्टर्स तसेच जवळपास ४५० सेवादल स्वयंसेवक आपल्या सेवा देत होते. समागमामध्ये येणार्या सर्व भाविकांसाठी निःशुल्क महाप्रसाद म्हणजेच लंगरची व्यवस्था तीन ठिकाणी करण्यात आली होती. या लंगर व्यवस्थेमध्ये ७२ क्विंटल तांदूळ एकाच वेळी सिजवला जाण्याची क्षमता होती तसेच ७० हजार भाविक एकाच वेळी भोजन करु शकतील अशी व्यवस्था होती. सतगुरु प्रवचना व्यतिरिक्त २४ तास लंगर उपलब्ध होते. या व्यतिरिक्त अत्यल्प दराने अल्पोपहार, मिनरल वॉटर व चहा-कॉफी इत्यादि उपलब्ध करुन देण्यासाठी ४ कॅन्टीन्सची व्यवस्था करण्यात आली होती.

पान १ वरुन

### हक्कभंग कारवाई ...

करावयाची होती परंतु आपण परस्पर वरिष्ठ कार्यालयाची परवानगी/मान्यता न घेता तुम्ही तुमच्या स्तरावरुन निमंत्रण पत्रिका व कार्यक्रमाचे नियोजन केले असे दिसुन येत आहे.

संदर्भीय पत्रान्वये डॉ. कल्याण वैजिनाथराव काळे, संसद सदस्य (लोकसभा) जालना यांचे निमंत्रण पत्रिकेमध्ये नाव न टाकता व त्यांना न बोलता कार्यक्रम आयोजित करुन नामांतरणांचा कार्यक्रम पार पाडला आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी कायद्याचे उल्लघंन झाल्याचे निर्देशनात आले आहे. त्यामुळे आपण आपल्या स्तरावरुन संस्थाप्रमुख या नात्याने खुलास २४ तासांच्या आत सादर करावा जर खुलास सादर न केल्यास आपल्या विरोधात संदर्भीय पत्रान्वये विशेष हक्कभंग समितीकडे हक्कभंगाची कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात येणार आहे यांची आपण गार्भियाने नोंद घ्यावी असे पत्र पाठविले.

या संदर्भात प्राचार्याने खुलसा सादर करतांना असे म्हटले की, स्वातंत्र सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन जि. जालना संदर्भ क्र.१ व २ अन्वये खुलासा सादर करण्यात येते की, दि. २५.0१.२०२५ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोकरदन जि. जालना या संस्थेचे नामांतरण स्वातंत्र सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोकरदन जि. जालना असे करण्या करीता नामांतरण सोहळा आयोजित करण्या करिता दि. २१.0१.२०२५ मंगळवार रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी मा. आमदार श्री. संतोष रावसाहेब दानवे यांच्या कार्यालयातुन स्वीय सहाय्यक यांच्या मला व्यक्तिशः फोन करुन बोलवण्यात आले होते, त्यावेळी बोलवण्याचे उदिष्ट विचाराले असता त्यांनी मला सांगितले की आपण पहिले कार्यालया मध्ये या त्यानंतर चर्चा करु असे सांगितले, तिथे गेलो असतां त्यांनी मला कळविले की शासन निर्णयानुसार बदलण्यात आलेले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामांतारणाचा कार्यक्रम करावयाचा आहे अशा सुचना दिल्या त्यानुषंगाने मला सांगितले की निमंत्रण पत्रिका व कोनशीला आम्ही सागु त्याप्रमाणेच करुन आना आणि कार्यक्रम तात्काळ दोन दिवसातच घेण्यात यावा असे सांगितले. परंतु मी त्यांना कळविले की सदर कार्यक्रम हा शासकीय असल्याने मला नियमा प्रमाणे सर्व लोकप्रतिनिधी यांना कळवुन त्यांना निमंत्रण दयावे लागेल व निमंत्रण पत्रिकेमध्ये नाव टाकावे लागेल असे म्हटल्यानंतर ते मला म्हणाले की पत्रिक तयार करून आणा त्यानुसार संस्थेतील कर्मचाऱ्याऱ्यांनी निमंत्रण पत्रिका शासकीय नियमानुसार तयार केली परंतु त्यांनी सदर पत्रिका मान्य केली नाही आणि मी सुचवल्या प्रमाणे पत्रिका तयार करा असे सुचविले त्यानुसार पत्रिका तयार केली. परंतु सदर निमंत्रण पत्रिका ही कुठेही वाटप केलेली नाही. परंतु स्वातंत्र सेनानी पुंडलिक हरी दानवे यांचे कुटुंबांना अमंत्रित करणे गरजेचे असल्याने त्यांना सदर निमंत्रण पत्रिका देण्यात आली होती.

सदर कार्यक्रम तालुकास्तरावर घेण्याची आमची मानसिकता नव्हती कारण मा. संचालक महोदयांनी सुचविल्या प्रमाणे दिनांक २३.0१.२०२५ रोजी जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धाचे आयोजन असल्याने सर्व कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी हे क्रिडा स्पर्धाच्या तयारी व्यवस्थेत होते आणि माझ्या कडे सिल्लोड येथील कार्यभार असतांना देखील भोकरदन येथील कार्यभार हा प्रभारी असल्याने सदर नामांतरणाचा कार्यक्रमाची तयारी ही भोकरदन येथील कार्यालयीन कर्मचाऱ्यांना नियोजन करण्याच्या सुचना दिल्या परंतु स्थानिक लोकप्रतिनिधीच्या स्वीय सहायकाने केलेल्या सूचनेनुसार अल्पवधीत कार्यक्रम घेण्याच्या सुचना दिल्या त्यामुळे कर्मचारी वर्गाने कोणत्याही शासकीय कार्यालय व प्रसिध्द माध्यमांना कळविण्यात आले नाही. फक्त कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थ्यांना बोलविण्यात आले होते.

सदर कार्यक्रम मोठा व्हावा असा मानस असतानाही सदर कार्यक्रमाच्या सुचनामुळे दबावात येऊन हा कार्यक्रम त्यांनी सांगितल्या नुसार घेण्यात आला त्यामुळे अनावधाने आपले नाव निमंत्रण पत्रिकेमध्ये टाकण्याचे राहिले व निमंत्रण देण्याचे देखील राहुन गेले त्याबदल मी आपली दिलगिरी व्यकत करतो. सदर एक वेळची बाब म्हणुन पहिली व शेवटची चुक मान्य करुन मला क्षमा करण्यात यावी व सदर खुलासा मान्य करावा हि नम्रपूर्वक विनंती असे के.बी. ठाकुर म्हणाले.

माझ्याकडे समन्वयक म्हणून सदर कार्यक्रमाच्या मंडप व बैठक व्यवस्थेची जबाबदारी होती. माझ्या मार्फत कोणासही निमंत्रण देण्यात आलेले नाही. व्यक्तीशः मी स्वतः आपला हेतूपुरस्सर अवमान होईल असे कोणतेही काम झालेले नाही तरीही अनावधानाने झालेल्या चुकीबद्दल दिलगीरी व्यक्त करतो असे नाईक एस.एस. यांनी केले. तर जाधव यांनी संस्था प्रमुखांच्या निर्देशानुसार कार्यक्रम पत्रिका व कोनशिला तयार करण्यांत आली होती. मी एक कर्मचारी म्हणुन कार्यक्रमास हजर होतो. संस्थेच्या निर्णय प्रक्रियेत शासन नियमाप्रमाणे संस्था प्रमुख निर्णय घेतात. संस्थेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये मी सहभागी नसल्यामुळे इतर मुद्दे मला सुचवता आले नाही. याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. सदरची एकवेळची बाब म्हणुन पहिली व शेवटची चुक मान्य करून मला क्षमा करावी अशी याचना केली आहे.

### विद्यार्थ्यांच्या आवाजाने ...

गुलाबजामुन, शैक्षणिक साहित्य, खमंग पापड, चना उसळ, पोहे अशा अनेक प्रकारचे स्टॉल मांडून उत्तम प्रकारे वस्तूंची विक्री केली. त्यामुळे साहजिकच विद्यार्थ्यांना हिशोब करताना गणितीय आकडेमोड करून पैशांचे व्यवस्थापन करता येत होते ..बाजारात आपल्या वस्तू विकण्यासाठी ग्राहकांना आकर्षित करत असताना ताजी भाजी, कोवळी भाजी गरम भजी, खमंग पापड,गोड पेरू घ्या, घ्या काका, घ्या दादा, घ्या मामा ,घ्या मावशी, अशा प्रकारच्या आवाजाने शालेय परिसर अक्षरशः दणाणून गेला होता..शाळेचे माजी विद्यार्थी, शिक्षण प्रेमी,पालक तसेच गावातील नागरिक यांनी खरेदीसाठी प्रचंड गर्दी केली होती. त्यांनी वस्तू व पदार्थ खरेदी करून विद्यार्थ्यांचा उत्साह व आनंद आणखी वाढवला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक नाविन्यपूर्ण अनुभव अनुभवण्यास मिळाला होता.. सदर आनंदनगरीच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अंभोरे , शिक्षक प्रदिप मेहेत्रे , दिपक लोदवाल , सदाशिव वाघ , शरद ताठे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्यांनी उत्कृष्ट नियोजन व परिश्रम करून बालबाजार (आनंदनगरी) चे यशस्वी आयोजन केले.

### कायद्याचे कठोर ...

यावर भर दिला जातो, त्यामुळे लाउडस्पीकरचा आवाज नियमानुसार ठेवणे गरजेचे आहे. ते ताजदार-ए-बगदाद कॉन्फरन्ससाठी जालन्यात आले होते आणि रजा अकादमी, जालना यांनी आयोजित बैठकीत मुस्लिम समाजाला मार्गदर्शन करत होते. या वेळी रजा अकादमी मराठवाडा अध्यक्ष सैय्यद जमील मौलाना व उलेमा सहित प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. मोईनुद्दीन अशरफी यांनी सांगितले की काही मशिदींच्या विश्वस्तांमध्ये लाउडस्पीकरच्या आवाजाबाबत अनावश्यक स्पर्धा पाहायला मिळत आहे. अजानचा मूळ उद्देश हा मशिदीच्या परिसरातील लोकांना नमाजासाठी आमंत्रित करणे हा आहे. मात्र, काही ठिकाणी शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आवाज पोहोचवण्याची चढाओढ सुरू आहे, ज्यामुळे नागरिकांना त्रास होतो.

इस्लाममध्ये रस्त्यावर पडलेला काटा, दगड हटवणे देखील ईमानचा एक भाग मानले जाते. त्यामुळे मुस्लिम समाजाने लाउडस्पीकरचा आवाज नियंत्रित ठेवावा, जेणेकरून कोणालाही गैरसोय होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वक्फ सुधारणा विधेयक मुसलमानांवर जबरदस्ती लादले जात आहे!

वक्फ सुधारणा विधेयकावर नाराजी व्यक्त करताना मोईनुद्दीन अशरफी यांनी सांगितले की त्यांनी संयुक्त संसदीय समिती (गझउ) समोर आपली भूमिका स्पष्ट केली होती. ही बैठक ठरवलेल्या एका तासाऐवजी तब्बल तीन तास चालली, तरीही मुस्लिम समाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले.

हे विधेयक मुसलमानांवर जबरदस्तीने लादले जात आहे. गरज पडल्यास या कायद्याविरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करू, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांनी वक्फ बोर्डाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सांगितले की वक्फ हा पूर्णपणे धार्मिक संस्था आहे, परंतु त्यात अशा लोकांची नेमणूक केली जात आहे, ज्यांना याबद्दल मूलभूत माहितीही नाही. रजा अकादमी मराठवाडा अध्यक्ष सैय्यद जमील मौलाना यांनी देखील या मुद्द्यावर भाष्य करत सांगितले की देशात चुकीची माहिती पसरवली जात आहे की भारतीय रेल्वेनंतर सर्वाधिक जमीन वक्फ बोर्डाकडे आहे.

जोपर्यंत अधिकृत सर्वेक्षण होत नाही, तोपर्यंत अशा भ्रामक गोष्टींवर विश्वास ठेवू नये. इंटरनेटवर शोध घेतल्यास स्पष्ट होईल की देशात सर्वाधिक जमीन मंदिरांकडे आहे, त्यानंतर रेल्वे, नंतर सैन्य आणि मग वक्फच्या मालकीची संपत्ती आहे, असे त्यांनी नमूद केले.

या बैठकीत मुफ्ती गुलाम नबी, मुनव्वरखान लाला, हाफिज अमजद रजा, हाफिज सैय्यद उमर, मौलाना नौशाद अलीमी, मौलाना तौफीक अलीमी, अत्तिक रजवी, एड. अरशद बागवान, डॉ. यासीन, डॉ. शाहनवाज, अय्यूब खान आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी विविध संस्थांनी मोईनुद्दीन अशरफी यांचे भव्य स्वागत केले.

# सनातन धर्माची ज्योत तेवत ठेवण्यासाठी हिंदु धर्मासाठी शेकडो वर्षांपासून कार्यरत असलेले अद्वितीय आखाडे !

कुंभ मेळा भारतीय महान संस्कृती आणि श्रध्देचे प्रतीक आहे. कुंभ मेळ्याचे भक्तिमय वातावरण म्हणजे सकारात्मक ऊर्जा आणि आत्मिक शांततेचा स्रोत आहे. 'युनेस्को'ने 'विश्वातील सर्वांत मोठे शांतीपूर्ण आणि धार्मिक संमेलन', असे निरीक्षण नोंदवत 'मानवतेचा अमूर्त सांस्कृतिक ठेवा' म्हणून कुंभला मान्यता दिली आहे. कुंभमेळा हा केवळ भारतियांसाठीच नव्हे, तर विश्वभरासाठी श्रद्धा आणि आकर्षण यांचे केंद्र बनला आहे. कुंभमेळ्याच्या वेळी भरलेल्या धार्मिक संमेलनात शस्त्र धारण करण्याविषयी निर्णय होऊन एकत्र येण्याचे 'अखंड आवाहन' करण्यात आले. 'अखंड' शब्द पुढे आखाडा या नावे रुढ झाला. आखाडे हे महाकुंभमेळ्यातील मुख्य आकर्षण आहेत. मुस्लिम शासकांच्या आक्रमणापासून हिंदू धर्माचे तसेच हिंदू तीर्थक्षेत्र स्थळांचे रक्षण करण्यासाठी असे आखाडे निर्माण झाले. आखाड्यांमध्ये कुस्तीचा आखाडा आपल्याला माहिती आहे; पण साधूंचे हे आखाडे, म्हणजे हिंदु धर्माचे म्हणजेच सनातन धर्माचे रक्षण करणार्या लढवय्या साधूंची एक सेनाच असते. कुंभमेळ्यातील शाही स्नानात वेगवेगळ्या आखाड्यातील साधूसंतांना अग्रक्रम दिला जातो हे आपण ऐकले असेलच. आता हे आखाडे काय, कोणते? असे प्रश्न आपल्यापैकी बऱ्याच जणांना पडत असतील. त्यासाठीच हा लेखप्रपंच.

**आखाड्यांची निर्मिती !** हिंदु धर्म तत्कालीन विविध विचारसरणींच्या अथवा तत्त्वज्ञानाच्या प्रभावाने झाकोळला जात होता, तसेच त्याच्या अनुयायांची दिशाभूल होत होती. भविष्यात हिंदु धर्मावर वाढत्या संकटांचा विचार करून आद्यशंकराचार्यांनी भारताच्या ४ दिशेला ४ पिठांची स्थापना केली. या पिठांच्या अंतर्गत जे साधू एकत्र येतील, त्यांना शास्त्रासह शस्त्र चालवण्याचेही ज्ञान असले पाहिजे. त्यामुळे आखाड्यांची निर्मिती झाली. प्रमुख आखाडे प्रथम ४ होते; मात्र त्यांच्यातील उपासनापद्धत, नियम यांवरून वादाचे प्रसंग घडले. त्यामुळे या ४ आखाड्यांचे आखाडे वाढत जाऊन ते सध्या १३ आखाडे झाले आहेत. यामध्ये ७ आखाडे हे शैव पंथीय आहेत, ३ वैष्णव पंथीय आणि ३ हे उदासीन संप्रदायाचे आहेत. काही आखाड्यांची निर्मिती मात्र ८ व्या शतकापूर्वीच झाली, फक्त त्यांचे नामाभिधान नंतर झाले, असे आखाड्यांचे म्हणणे असते.

**उत्पत्ती आणि व्याप्ती !** जैन, बौद्ध आणि इस्लाम धर्मांचा भारतात उदय झाल्यामुळे धर्माचे अस्तित्व संकटात आले. म्हणून मठांनी ज्ञानोपासनासोबतच या विदेशी आक्रमणांचा प्रत्युत्तर देण्यासाठी शस्त्रधारी दल तयार केले आणि त्यांना 'आखाडे' या संज्ञेने संबोधले. उत्तर भारतापासून गोदावरी नदीपर्यंत राहणारे सर्व पंथीय साधू १४ संघांमध्ये वस्ती करतात. हे १३ संघच १३ 'आखाडे' आहेत.

**दशनामी अखाडे** या अखाड्यांमध्ये सात अखाडे आहेत - महानिर्वाणी, अटल, निरंजनी, आनंद, जुना (भैरव), आह्वान आणि अग्नि.

**वैष्णव अखाडे** तीन प्रमुख वैष्णव अखाडे आहेत - दिगंबर, निर्मोही, निर्वाणी. (यामध्ये १८ उपअखाडे आणि खालसा देखील आहेत.)

**उदासीन अखाडे** यात दोन अखाडे आहेत. उदासीन पंचायती बडा अखाडा आणि उदासीन पंचायती नया अखाडा.

**निर्मल अखाडा** सिखांचे हे अखाडा गुरु गोविंदसिंग यांच्या प्रेरणेतून स्थापित झाले.

**आखाड्यांचे अग्रक्रम**

कुंभमेळ्यात पर्वस्नानासाठी अखाड्यांचा अग्रक्रम!

पूर्वी धर्मरक्षण करतांना अखाड्यांचे साधू-संत युद्धात सहभागी होत असत, त्यामुळे गंगास्नानासाठी अखाड्यांच्या शस्त्रधारी साधू-संतांना अग्रक्रम दिला जातो. आजही ही परंपरा चालू आहे. यातील साधू-संतांचे स्नान कुंभमेळ्याची एक महत्त्वाची विधी मानली जाते. साधू-संत स्नान न केल्यास भक्त स्नान करत नाहीत.

**शैव पंथीय अखाडे** आद्यशंकराचार्य यांनी शैव परंपरेतील संन्यास्यांची १० गटात वर्गीकरण केले. याला 'दशनामी अखाडे' म्हणून ओळखले जाते. या अखाड्यांचे ७ प्रकार आहेत.

**वैष्णव पंथीय अखाडे** जगद्गुरु रामानंदाचार्य आणि भावानंदाचार्य यांच्या शिष्यांनी श्रीरामचंद्र भगवानाचा उपास्य देव मानला आणि तीन बैरागी (वैष्णव) अखाड्यांची स्थापना केली

**आखाड्यांचा क्रम पुढीलप्रमाणे आहे !**

**शैव पंथीय आखाडे** १. श्री आवाहन आखाडा २. श्री अटल आखाडा ३. श्री आनंद आखाडा ४. श्री निरंजनी आखाडा ५. श्री जुना आखाडा ६. श्री पंचअग्नि आखाडा, ७. श्री महानिर्वाणी आखाडा

**उदासीन आखाडे** १. श्री उदासिनी पंचायती बडा आखाडा २. श्री उदासिनी नया आखाडा ३. श्री निर्मल पंचायती आखाडा

**श्री वैष्णव आखाडे** १. श्री पंच दिगंबर आखाडा २. श्री पंच निर्मोही आखाडा ३. श्री पंच निर्वाणी आखाडा

**शैव पंथीय आखाडे** शैव संप्रदाय हा भगवान शिव यांची पूजा करतात. या संप्रदायायतील साधूगण हे भगवान शिव शिवाय अन्य कोणत्याही देवाला सर्वोच्च स्थान देत नाहीत. ते केवळ शिव आणि त्यांच्याच विविध अवताराचं पूजन करतात. या संप्रदायातील साधूगणांचं रुप हे भगवान शिव यांच्याशी मिळत-जुळत ठेवलं जातं. निर्वस्त्र राहणे किंवा भगव्या रंगाचे कपडे या संप्रदायातील लोक वापरत असतात. अंगाला राख लावणे, गळ्यात माळा घालणे, केसाच्या जटा ठेवणं, हातात आयुध घेणं अशा रुपात ते वावरत असतात. शैव संप्रदायांच्या परंपरांविषयी वेद आणि उपनिषिधामध्ये नोंद केलेल्या गोष्टीनुसार चालते. महाभारतामध्ये सुद्धा शैव संप्रदायाचा उल्लेख आढळतो. या संप्रदायातील साधूंना नाथ, अघोरी, अवधूत, बाबा, औघड, योगी किंवा सिद्ध नावाने ओळखलं जातं. या संप्रदायामध्येच नागा साधू असतात. तसंच या संप्रदायात अघोरी साधूही असतात. या संप्रदायाचे निर्वाणी, अटल, निरंजनी, आनंद, जुना, आवाहन, अग्नी असे एकूण ७ आखाडे आहेत. त्यापैकी जूना अखाडा हा शैव संप्रदायातील सर्वात मोठा आखाडा आहे. आद्य शंकराचार्यांनी शैव परंपरेतील संघटित संन्यास्यांचा दहा गटांमध्ये वर्गीकरण केले आहे. हे गट पुढीलप्रमाणे आहेत - १. गिरी, २. पुरी, ३. भारती, ४. तीर्थ, ५. वन, ६. अरण्य, ७. पर्वत, ८. आश्रम, ९. सागर आणि १०. सरस्वती. या संघटित गटांना 'दशनामी आखाडे' या नावाने ओळखले जाते. या आखाड्यांचे ७ प्रकार आहेत. प्रत्येक आखाड्याचे देवता आणि ध्वज वेगवेगळे असतात. शैव पंथीय संन्यास्यांच्या आखाड्यांमध्ये धार्मिक शिक्षेसोबतच शस्त्र चालवण्याचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात क्षात्रतेज जाणवते.




**वैष्णव पंथीय आखाडे** भगवान विष्णु यांची उपासना करणाऱ्या मठवासियांचा समावेश वैष्णव संप्रदायात होतो. या समुदाय भगवान विष्णुसह त्यांच्या विविध रुपांची आराधना करतात. रामानुज, माधवाचार्य आणि वल्लभाचार्य हे या संप्रदायाचे तीन प्रमुख संत होते. जगद्गुरु श्री रामानंदाचार्यांचे काही शिष्य आणि श्री भावानंदाचार्य यांचे शिष्य श्री बालानंद यांनी प्रभु श्रीरामचंद्रांना आपले आराध्य देव मानले. त्यांनी चारही वैष्णव संप्रदायांना एकत्र आणून तीन बैरागी (वैष्णव) आखाड्यांची स्थापना केली. वैष्णव आखाड्यांमध्ये देखील शस्त्र आणि शास्त्र यांचे कठोर शिक्षण दिले जाते. हे साधू 'बैरागी' किंवा 'अलख' म्हणून ओळखले जातात. हिंदू धर्मीय आणि त्यांचे देवालय यांचे विधर्मी आक्रमणांपासून संरक्षण करणे, हे या आखाड्यांचे प्रमुख कर्तव्य आहे.

या आखाड्यामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिंना संन्यास घेतल्यावर तीन वर्ष 'टहल' म्हणजे तेथील साधू-संतांची सेवा करावी लागते. खूप वर्षे सेवा केल्यानंतर त्यांना नागा हे पद मिळतं. तेव्हा त्यांच्यावर आखाड्याशी संबंधित महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या दिल्या जातात. या जबाबदाऱ्या यशस्वी पूर्ण केल्यावर त्यांना पुजारी ही पदवी मिळते. या संप्रदायात महंत पदवी मिळवण्यासाठी वर्षोनुवर्षे धर्माची सेवा करावी लागते. महंत हेच या संप्रदायातील आखाड्यांचं सर्वोच्च पद आहे. या संप्रदायातील तिन्ही आखाड्यांचे तीन वेगवेगळे श्रीमहंत असतात. त्यानंतर महामंडलेश्वर असतात. महामंडलेश्वर हे संन्यासाकरता दीक्षा देतात. तसंच धर्म प्रचार करण्याची जबाबदारी या महामंडलेश्वरांवर असते.

या संप्रदायातील संन्यासी हे आपल्या कपाळावर भगवान विष्णु यांचं प्रतिक असलेला चंदनाचा टिळा लावतात. तर गळ्यात तुळशीची माळ घालतात. पवित्रता आणि भक्तीचं प्रतिक म्हणून ही माळ घालतात. जन्माष्टमी, राम नवमी आणि वैकुंठ एकदशीला या संप्रदायामध्ये खूप महत्त्व दिलं जातं. तसंच भगवान विष्णु यांच्याशी संबंधित असलेले वृंदावन, मथुरा आणि तिरुपती ही स्थळं या संप्रदायांची प्रमुख तीर्थस्थानं आहेत.

**उदासीन आखाडे**

सनातन धर्मासह शीख धर्माचे आणि त्यांची प्रार्थनास्थळ गुरुद्वाराच्या रक्षणासाठी सुद्धा विशेष आखाडा अस्तित्वात आहे. या आखाड्याच्या संप्रदायांना उदासीन किंवा उदासी संप्रदाय असं म्हणतात. या संप्रदायाचं केंद्र हे उत्तर भारत आहे. याची स्थापना शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक यांचे पुत्र चंद यांनी केली आहे. त्यांना बाबा श्री चंद्र किंवा भगवान श्री चंद्र नावानं संबोधलं जातं. जल, अग्नी, पृथ्वी, वायु आणि आकाश या पंचभूतांची ते उपासना करतात. आणि शिख धर्मियांचा 'आदिग्रंथ हा त्यांचा धार्मिक ग्रंथ आहे.

श्री पंचायती आखाडा बडा उदासीन, श्री पंचायती आखाडा नया उदासीन आणि श्री निर्मल पंचायती हे तीन आखाडे उदासीन संप्रदायातील आहेत. या संप्रदायातील साधू ही संन्यासी आणि गृह संसारापासून दूर असतात. ते अहिंसक प्रवृत्तीचे असतात. त्यांना नानक पुत्र म्हणून संबोधलं जातं. ते हिंदू आणि शिख अशा दोन्ही धर्माचं पालन करतात. सकल हिंदू समाजाप्रमाणे या संप्रदायातील साधूही विविध व्रत आणि उत्सव साजरे करतात. ते देश-विदेशात भारतीय संस्कृतीचा प्रसार करतात.

कुंभ मेळाव्यादरम्यान उदासीन संप्रदायातील श्री पंचायती आखाडा नया उदासीन या आखाड्यामध्ये दर दिवशी हजार लोकांसाठी लंगरची सुविधा दिली जाते. त्याचप्रमाणे आरोग्य शिबिर आणि संतांच्या प्रवचनाचं आयोजन केलं जातं.

परधर्मीय आक्रमणकर्त्यांविरुद्ध अनेक वेळा सशस्त्र युद्ध करून धर्मरक्षणाचे मोठे कार्य केले - हिंदूंवर अनन्वित अत्याचार करणाऱ्या या इस्लामी आक्रमणकर्त्यांचा प्रतिकार करण्यात त्या काळातील हिंदू राजसत्ता काहीशी असमर्थ ठरली. त्यामुळे साधू-संतांनी धर्मसंरक्षणासाठी दंड उचलला. नागा संप्रदाय आणि दशनामी संन्यासी एकत्र आले. शक्तीचे प्रतीक असलेला भाला त्यांनी शस्त्र म्हणून स्वीकारला. मल्लविद्या तसेच तलवार आणि इतर शस्त्रांचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले.

नागा आणि दशनामी संन्यास्यांचे 'प्राचीन आध्यात्मिक परंपरेचे रक्षण करणारे शास्त्रधारी' आणि 'धर्मरक्षणासाठी लढणारे शस्त्रधारी' असे दोन प्रकार करण्यात आले. या संन्यास्यांनी धर्मरक्षणासाठी पुढीलप्रमाणे ऐतिहासिक कार्य केले.

वर्ष १६८९ मध्ये प्रयाग (इलाहाबाद) आणि हरिद्वार या तीर्थक्षेत्रांवर झालेल्या मुघलांच्या आक्रमणांचा नागा साधूंनी आपल्या महान पराक्रमाने पराभव केला.

वर्ष १७४८ मध्ये अहमदशाह अब्दालीचे आक्रमण तसेच १७५७ मध्ये मथुरेवर झालेले आक्रमण, यामध्ये असंख्य साधूंनी वीरमरण पत्करून हा प्रसंग संपवला.

राजेंद्रगिरी नावाच्या नागा साधूंच्या नेतृत्वाखाली १७५१ ते १७५३ या काळात झाशीच्या शेजारील ३२ गावांमधील मुघल सत्ता उखडून टाकली आणि तिथे स्वातंत्र्याचा ध्वज फडकवला.

साधू-संतच नव्हे, तर बैराग्यांनीही अशाच प्रकारे परधर्मीय आक्रमणकर्त्यांविरुद्ध अनेक वेळा सशस्त्र युद्ध करून धर्मरक्षणाचे मोठे कार्य केले. ज्ञानसंपन्न असूनही सशस्त्र राहिलेल्या शैव आणि वैष्णव अखाड्यांच्या साधूंमुळे शस्त्रविहीन, शांतताप्रिय हिंदू समाजाला दिलासा मिळाला आणि इस्लामी आक्रमण सिंधच्या सीमांपर्यंतच मर्यादित राहिले, हा ऐतिहासिक सत्य आहे.

**महाकुंभाचा राजा - आवाहन आखाडा !**

या संप्रदायातील आवाहन आखाड्याला 'आद्य आखाडा' म्हणतात. आवाहन आखाड्याला महाकुंभाचा राजा असे म्हटले जाते. हा पुष्कळ जुना आखाडा आहे. प्रत्येक आखाड्याचा एक ध्वज असतो. या ध्वजाचा अर्थ 'आखाडा निरंतर गतीशील आहे', असा आहे. 'आवाहन आखाड्याची स्थापना वर्ष ६ व्या शतकामध्ये झाली. सध्या त्यामध्ये ५२ सहस्र साधू आहेत', असे आखाडा प्रमुखांचे म्हणणे आहे.

**आखाड्यांच्या धर्मध्वज पूजनाने कुंभमेळ्यास प्रारंभ !**

आखाड्याचा धर्मध्वज असतो, त्यामध्ये ५२ बंध अनिवार्य असतात. ध्वज लावणे ही सिंहस्थ चालू झाल्याची खूण असते.

आद्यशंकराचार्य यांचा पहिला आखाडा आवाहन आखाडाच आहे. आखाड्यांच्या धर्मध्वज पूजनाने कुंभमेळ्याचा प्रारंभ होतो. आखाड्यांतील साधू जेव्हा आखाड्याच्या क्षेत्रात वाजत-गाजत मिरवणुकीतून चालत, हत्ती, घोडे यांवर बसून प्रवेश करतात, त्याला 'पेशवाई' मिरवणूक म्हणतात. ही पेशवाई मिरवणूक कुंभमेळ्याचे आकर्षण असते. या वेळी विविध आखाड्यांतील साधू त्यांच्या आखाड्यात परंपरेने असलेल्या शस्त्रांचे प्रदर्शन करतात. काही साधू या शस्त्रांचे प्रात्यक्षिक करतात. नागा साधू हे शंकराचार्यांचे लढवय्या दल असल्याने त्यांच्याकडे तलवार, भाला, दांडपट्टा अशी पारंपरिक शस्त्रास्त्रे असतात.

**आखाड्यातील अखंड धुनी !**

आवाहन आखाड्यात एक अखंड धुनी पेटती आहे. ही धुनी १ सहस्र ५०० वर्षांपासून पेटत आहे. या धुनीची पूजा केली जाते. या धुनीला 'सनातन परंपरेची चेतना' म्हणतात, त्यामुळे या धुनीला विझू देत नाहीत. कुंभमेळ्यात आखाड्यांमध्ये पूर्वापार अग्निमंत्र म्हणून अग्नी प्रज्वलित केला जायचा, आता अरणी मंथाने आग पेटवतात.

**देश आणि सनातन धर्मरक्षण हे आखाड्यांचे मुख्य कार्य!**

कुंभमेळ्याच्या कालावधीत आखाड्यांतील दिसणारे हे साधू एरव्ही घनदाट जंगलात तपश्चर्या, साधना करतात, तसेच सर्वसामान्य वस्तीपासून, मानवी वावरापासून दूर रहाणे पसंत करतात. त्यामुळे हे साधू एरव्ही कुठे दिसत नाहीत. या आखाड्याने त्यांची शस्त्रास्त्रे सांभाळून ठेवली आहेत. लेखात सांगितल्याप्रमाणे देश आणि सनातन धर्मरक्षण हे आखाड्यांचे मुख्य कार्य आहे. आवाहन आखाड्याने वर्ष १८५७ च्या इंग्रजांविरुद्धच्या उठावाच्या वेळी राणी लक्ष्मीबाईंच्या बाजूने इंग्रजांच्या विरुद्ध युद्ध केले. या आखाड्यातील ४० सहस्र साधू तेव्हा हुतात्मा झाले होते. महाराणी लक्ष्मीबाईंचा राजतिलक याच आखाड्याने केला होता. आखाड्यांना असे धर्मरक्षणाचे कार्य करावे लागते. त्यामुळे त्यांचे प्रशिक्षण कठीण असते. मुगल साम्राज्यात त्यांनी मोगलांविरुद्ध युद्ध केले, तेव्हाही अनेकांनी बलीदाने दिली आहेत. 'धर्मरक्षणासाठी बलीदान करणे, हा समाजासाठी सर्वोच्च त्याग आहे', असे आवाहन आखाड्याचे साधू मानतात.

**भारतीय समाजात आखाड्यांचा प्रभाव !**

शतकानुशतके, आखाड्यांनी हिंदू परंपरा, मंदिरे आणि पवित्र स्थळांच्या रक्षणासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे, हिंदू धर्मात आखाड्यांना अनेक कारणांमुळे खूप महत्त्व आहे. प्राचीन अध्यात्मिक परंपरा, विधी आणि शिकवणी जपण्यात आखाडे महत्त्वाची भूमिका बजावतात.

सर्व संप्रदाय एकत्र यावेत, यासाठी आदि शंकराचार्य यांनी कुंभमेळा चालू करून दशनामी आखाडे यांचीही निर्मिती त्यांनी केली. या दशनामी आखाड्यातील प्रत्येकाचे कार्यही ठरवून दिले. परदेशी अधर्मी लोकांचे आक्रमण नियंत्रित ठेवण्यापासून ते अगदी सागर आणि महासागर यांच्या रक्षणाचे दायित्व, पर्वत, शिखरे यांचे रक्षण अन् त्यांच्या नैसर्गिक वैविध्याची सुरक्षितता असे दायित्व त्या त्या आखाड्यानुसार दिले होते. प्रत्येक आखाडा, त्याच्या अद्वितीय तत्त्वज्ञान आणि पद्धतींसह आध्यात्मिक प्रवासात योगदान देतो. या आखाड्यांची एकत्रित उपस्थिती विविधतेतील एकतेचे प्रतीक आहे कारण विविध मार्गांचे साधक अध्यात्माच्या अमर्याद क्षेत्रांचा शोध घेण्यासाठी एकत्र येतात. अशा प्रकारे, या आखाड्यांचा प्रभाव आजही भारतीय समाजात धर्म, संस्कृती आणि सामाजिक समरसतेच्या संदर्भात अनमोल आहे. आजही जिहादी आक्रमणांची चिन्हे दिसत आहेत. त्यासाठी साधू-संतांनी धर्मरक्षणासाठी एकत्र येणे आणि शस्त्रधारी रहाणे आवश्यक आहे.



**सुनील घनवट,**
**समन्वयक, हिंदू जनजागृती समिती,**
**संपर्क : ७०२०३८३२६४**

## सामाजिक विचार मंचातर्फे व्याख्यानमालेचे आयोजन

**भांडुप । प्रतिनिधी -** दरवर्षीप्रमाणेच यावर्षी देखील सामाजिक विचार मंचाने वैचारिक अशा व्याख्यानमालेचे आयोजन दि. ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत रात्रौ ७.०० वा. कांजुर को -ऑपरेटिव्ह सोसायटीचे मैदान (क्रॉम्प्टन मैदान )गणेश मंदिरासमोर, दातार कॉलनी, भांडुप (पुर्व)या ठिकाणी केले आहे.

कांजूर-भांडुप (पूर्व) विभागात स्वामी विवेकानंद यांच्या सार्थ शताब्दीचा मुहूर्त साधून २०१३ या वर्षापासून या व्याख्यानमालेस सुरुवात झाली. त्यानुसार दरवर्षी अभ्यासू व नावाजलेल्या व्याख्यात्यांना याठिकाणी निमंत्रित केले जाते. यावेळी शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी व्याख्यात्या सौ. प्रज्ञा दर्भे सुखी संसाराचा पासवर्ड या विषयावर तर शनिवार दि. १ फेब्रुवारी रोजी व्याख्याते डॉ. अशोक बांगर धर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर या विषयावर आणि रविवार दि. २ फेब्रुवारी रोजी व्याख्याते श्री. मंदार गजानन ओक हे सर्वधर्म परिषद आणि स्वामी विवेकानंद या विषयावर आपले विचारपुष्प गुंफणार आहेत. तरी कांजुर भांडुप परिसरातील नागरिकांनी या वैचारिक सुवर्णसंधीचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा. तसेच दानशूर व्यक्तींनी मंडळास स्वेच्छेने आर्थिक सहकार्य करावे असे आवाहन सा.वि.मंच आणि कार्यकारिणीमार्फत करण्यात आले आहे.

## विष्णु गायकवाड यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या जालना तालुका उपाध्यक्षपदी निवड



**सिंधीकाळेगाव । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील मौजपुरी येथील विष्णु किसनराव गायकवाड यांनी कॉंग्रेस पक्षातुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला.व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांनी त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन विष्णु किसनराव गायकवाड यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या जालना तालुका उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. सदरील ही नियुक्ती राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जालना जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण.विष्णपंत घुले, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवक तालुकाध्यक्ष उमेश मोहिते, लक्ष्मीकांत डोंगरे, संतोष खेडेकर, धनराज लहाने, प्रभाकर डोंगरे, गणेश भुतेकर, राहुल लष्कर यांच्यासह आदींची उपस्थिती होती. या नियुक्ती बद्दल विष्णु गायकवाड यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## उस्वद रोड डागडूजी थातूर मातूर...



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा ते उस्वद रोडवर खड्डे डागडूजीचे काम दि. २४ रोजी पासून चालू करण्यात आले असून ह्या कामाचा दर्जाहिन आणि थातूर मातूर पद्धतीने केल्या जात असल्याचे निवेदन (दि २९) रोजी मंठा सार्वजनिक उपविभागीय अभियंता सार्वजानिक बांधकाम उपविभाग मंठा येथे देण्यात आले सदरील काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे खड्डे बुजवण्या करिता डांबराचे प्रमाण अतिशय कमी प्रमाणत वापरण्यात येत आहे. खड्यात 'मोठ मोठाले' दगड येवून त्यावर मातिमिश्रीत कच टाकण्यात आली आहे. त्यामुळे सदरील कच व दगड हे वाहनाच्या भाराने जैसे थे, तसे होणार आहे.काम मे हे अंदाजपत्रकाची प्रत अर्जदारास देण्यात याही जणे करून वास्तवात कामावर झालेला खर्चाची आणि प्रत्यक्ष केलेले काम याची शहानिशा करता येईल तो पर्यंत या कामाची देयक देण्यात येवू नये नसता लोकशाही मार्गाचा अवलंब करावा लागेल असे अर्जदार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मंठा शहर अध्यक्ष गजानन बबनराव माळकर'यानी निवेदनात म्हटले आहेत.

## मराठी भाषेचे जतन व संवर्धनाची चळवळ सर्व शासकीय कार्यालयातून उभारावी - प्रा. सोनवणे



**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्रातील सर्व व्यक्तींनी मराठी भाषेचा आग्रह धरुन समोरील व्यक्तींशी मराठी भाषेतच संवाद साधावा. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ नुसार शासकीय कामकाज १०० टक्के मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. मराठी भाषा जतन व संवर्धनाची चळवळ सर्व शासकीय कार्यालयातून उभारावी, असे प्रतिपादन मराठी भाषा समितीचे अशासकीय सदस्य तथा जेईएस महाविद्यालयाचे प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवाडानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा समितीचे अशासकीय सदस्य तथा जेईएस महाविद्यालयाचे प्रा.राजेंद्र सोनवणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, तहसीलदार प्रणाली तायडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी, नायब तहसीलदार तुषार निकम, ज्योती वाघ यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या मुख्य धोरणास अनुसरुन मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा दि.१४ ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा करण्यात येत असतो. सर्व शासकीय निमशासकीय कार्यालये, महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था, महाविद्यालयामधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा केला जात असतो. असेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हभप स्वर्गीय किसन महाराज साखरे यांना श्रद्धांजली

**जालना । प्रतिनिधी** - श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सत्संग मंडळ जालना यांच्या वतीने गुरुवर्य ह भ प स्वर्गीय डॉ श्री किसन महाराज साखरे आळंदी देवाची यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी जालन्यामध्ये साखरे महाराज यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला महाराजांच्या उपस्थितीत झालेल्या तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा ज्ञानेश्वरी पारायण सोहळा प्रवचन किर्तन तसेच श्री गुरुवर्य साखरे महाराज यांचा अखंड हरिनाम सप्ताह तेली पंचायत वाडा मोदीखाना येथे ३५ वर्ष सतत सुरू राहिला त्यावेळी एका अभंगावर महाराज सात दिवस कीर्तन करायचे आणि एका ज्ञानेश्वरीच्या ओवीवर सात दिवस प्रवचन करायचे जालनेकारांना महाराजांनी ज्ञानासोबत भरपूर प्रेम दिले ज्ञानेश्वरी लिखाणाला सातशे वर्षे पूर्ण झाल्याच्या प्रित्यर्थ जालन्यामध्ये



महाराजांचे ७०० शिष्यगण पारायणास बसले होते गीता ज्ञान यज्ञ सोहळा सुद्धा महाराजांच्या वाणीतून जालनेकारांनी अनुभवले अशा अनेक आठवणींना उजाळा देत अश्रूमय वातावरणात श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.

यावेळी ह भ प नाना महाराज पोखरीकर, ह भ प बाबुराव व्यवहारे, ह भ प नानासाहेब देशमुख, ह भ प प्रभाकर महाराज सुरासे, ह भ प भालचंद्र सर देशपांडे, सोपानराव दुसाने, लक्ष्मीकांतराव कंकाळ, भगवान महाराज कचरे, पांडुरंग महाराज दुसाने, विजयराव शीलवंत, कल्याणराव देशपांडे, दासोपंत जोशी, किरण राव शीलवंत, साईप्रसाद मालपाणी, श्रीनिवास महाराज पोखरीकर, अतुल व्यवहारे, अनिल व्यवहारे, राधाकृष्ण दुसाने, किशोर महाराज जिगे, बबनराव मोरे, सोपान पेंढारकर, रामेश्वर शीलवंत, तुकाराम जी डोंगरे, खैरनार गुरुजी, कारभारी शिंदे, रामेश्वर गडगिळे, संजय कातकडे, श्रीमती आशाताई मुळे, सौ शोभाताई पेंढारकर, सुभाष सिंग गौर, ईश्वर पोखरीकर, देशपांडे काका संदीप पाटोळे, विक्रम देशमुख यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

## प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रासाठी अर्ज करावेत

**जालना** - जिल्ह्यातील जालना तालुक्यातील सेवली, देवमुर्ती आणि मंठा तालुक्यातील तळणी तसेच भोकरदन तालुक्यातील वालसावंगी येथे कौशल्य विकास केंद्र स्थापन करावयाची आहेत. तरी जालना येथील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात दि.१ फेब्रुवारी पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी केले आहे.



**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे जालना दौऱ्यावर असतांना दौऱ्यानिमित्त छायाचित्रकार अनिल व्यवहारे यांनी टिपलेले फोटोग्राफ उपमुख्यमंत्री शिंदे व आ. अर्जुनराव खोतकर यांना दाखविण्यात आले. यावर अफलातून फोटोशूट अशा शब्दात उपमुख्यमंत्री यांनी श्री व्यवहारे यांच्या फोटोग्राफचे कौतुक केले.**

## कुंभमेळ्याहून परतणाऱ्या परतुर येथील भाविकांवर काळाचा घात

### कापसाच्या टेम्पोला कारची समोरून धडक एक जण ठार तर तीन जण गंभीर जखमी

मंठा । प्रतिनिधी - प्रयागराज कुंभमेळ्याहून वापस येणाऱ्या परतुर येथील भाविकांवर काळाचा घाल कापसाच्या टेम्पोला कारची समोरून धडक एक जण जागी ठार याविषयी सविस्तरवृत्ताशी की परतुर येथील चार भाविक प्रयागराज उत्तर प्रदेश येथे कुंभ मेळाव्यासाठी गेले होते.

प्रयागराज उत्तर प्रदेश कुंभमेळ्याहून दर्शन करून परत येत असताना मंठा शहरापासून जवळच असलेल्या शेगाव पंढरपूर महामार्गावरील महावीर जिनिंग समोर उभे असलेल्या एम एच २१ बी एच ३२८९ कापसाच्या ( अशोक लेलँड च्या) छोट्या टेम्पोला परतुर कडे जाणाऱ्या भाविकांच्या एम एच २१ बी व्ही २५ ६५ स्विफ्ट डिझायर कारचालकांचे नियंत्रण सुटल्याने टेम्पोला समोरून जोरदार धडक दिली दिली असता यशवंत शंकरराव रोहेनकर वय वर्ष ३८ राहणार परतुर यांचा जागीच मृत्यू झाला व इतर योगेश शेषराव वायाळ वय वर्ष ३५, आकाश प्रभाकर काळे वय वर्ष २८, सुरेश तुकाराम राऊत वय वर्ष ३१ सर्व राहणार परतुर गंभीर दुखापत झाली असता मंठा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता उपचार करून पुढील उपचारासाठी जालना येथे रेफर करण्यात आले .



## साई उत्सव जल्लोषात संपन्न



**मुंबई** - नवयुगनगर, दिवाणमान, वसई पश्चिम येथील शिवछाया मित्र मंडळ व साईदयाघना मंदिराचा ३७ वा वर्धापन व साई उत्सव २३,२४ व २५ जानेवारी २०२५ रोजी विविध धार्मिक,सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांने उत्साहात संपन्न झाला, गुरूवार दि.१६ ते २३ जानेवारी रोजी श्री साईसच्चरित पारायण सप्ताह व सायंकाळी साईबाबांच्या पादुका व प्रतिमेची पालखी मिरवणूक साईबाबांचा देखावा,लेझीम पथक, धुम्रवर्ण ढोल पथक,बेंजो ,जगदगुरू श्री नरेंद्र महाराज भजन मंडळ,सुंदर रांगोळ्या, गुलाब फुलांची पुष्पवृष्टी , रंगीबेरंगी फटाके आतषबाजी,पालखीचे मानकरी मा.श्री. हरिलाल जाधव,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,माणिकपूर पोलिस स्टेशन व मा.श्री.प्रशांत लांगी,पोलिस निरीक्षक,वाहतूक शाखा,वसई परिमंडळ-२ ,संदेशभाऊ जाधव व मंडळाचे पदाधिकारी,महिला साई भक्त पारंपरिक वेशभूषेत नाचत उत्साहात सहभागी झाले होते.दुसऱ्या दिवशी महिलांचा जल्लोष कार्यक्रमात , निवेदिका मोनिका यांनी महिलांचे विविध गंमतीदार खेळ घेतले व विजेत्या स्पर्धकांना गृह उपयोगी वस्तू बक्षिसे देण्यात आली यावेळी महिलांनी सोलो व ग्रुप नृत्य तसेच भारतीय नारींच्या पारंपरिक विविध वेशभूषा परिधान करून राष्ट्रीय एकात्मतेच दर्शन घडविले या सर्वांनाच बक्षीसे साहित्यप्रेमी मान्यवर सीमा पाटील,पल्लवी बनसोडे,संगीता अरबुने,सुषमा राऊत,स्वाती जोशी ,माजी नगरसेविका भारती ठाकूर,मीना अडसुळ,गीता मानकर व प्रियंका जाधव,बबीता छेडा,भारती पाटील इत्यादींच्या हस्ते देण्यात आली,पुष्पा जाधव यांनी उत्कृष्ट नियोजन केले व उपस्थित सर्वच महीलांना हळदीकुंकू,तिळाचे लाडू व आकर्षक उपयोगी भेटवस्तू अक्षता जाधव, निता गवस,श्रुती सावंत , श्रद्धा वनमाळी सामंत यांचे हस्ते देण्यात आल्यात. २५ जानेवारी हा साईबाबांच्या मुर्ती स्थापना दिन महाअभिषेक, होमहवन, श्री साईसत्यनारायण पुजा, सांज आरती, भंडारा प्रसाद, व सांस्कृतिक कार्यक्रम योगेश केळवेकर प्रस्तुत जल्लोष महाराष्ट्राचा महाराष्ट्राची संस्कृती व परंपरा दर्शविणारा संगीतमय नृत्याविष्कार , माजी आमदार क्षितिज ठाकूर यांचे हस्ते उत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य लाभलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आले, साईभक्त व नागरिकांच्या प्रचंड सहभागाने तिन दिवस भव्य जत्रा स्वरूप व परिसर साईमय झाला होता. शिवछाया मित्र मंडळाचे सर्वेसर्वा संदेशभाऊ, पुष्पाताई, अध्यक्ष मिलिंद जाधव, संतोष वनमाळी, शैलेश राऊत, एकनाथ गवस, प्रशांत जाधव, अभय सावंत, बंटी जाधव, सिद्धेश जाधव यांनी मेहनत घेतली आहे,




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282.
अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.